MHND150008092021

दाखल दिनांक– ०६.१२.२०२१
नोंदणी दिनांक– ०६.१२.२०२१
निकाल दिनांक– १८.०३.२०२६
कालावधी– वर्षे, म. दि.
०४ ०३ १२

**भाग–अ**

**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी धर्माबाद ता. धर्माबाद जि. नांदेड यांचे न्यायालयात**
**(पीठासीन अधिकारी श्री. एस. एम. कोळेकर)**

**नियमीत फौजदारी खटला क्रं.६६/२०२१** **निशाणी क्र. २१**

**गुन्हा नों.क्र.२३६/२०२१** **पोलीस स्टेशन धर्माबाद.**

महाराष्ट्र शासनातर्फे
पोलीस ठाणे अंमलदार,
पोलीस स्टेशन, धर्माबाद,
ता. धर्माबाद, जि.नांदेड. ........ **अभियोग पक्ष**

**विरुध्द**

पांडुरंग पुंडलिक कदम,
वय ६२ वर्षे, धंदा–शेती,
रा. येलापुर, ता.धर्माबाद जि. नांदेड ..........**आरोपी**

**दोषारोप** – **भारतीय दंड विधान १८६० चे कलम ३२४, ३२३, २९४, ५०६ सहकलम ३४ अन्वये.**

= = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = =

श्रीमती. एस.बी. काळे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता सरकार पक्षातर्फे
श्री. एस. यु. जगदंबे, वकील आरोपीतर्फे.

= = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = =

**भाग–ब**

| | | |
|---|---|---|
| १. | गुन्हा घडल्याची तारीख | ०७/१०/२०२१ |
| २. | गुन्हा दाखल तारीख | ०८/१०/२०२१ |
| ३. | दोषारोप दाखल तारीख | ०६/१२/२०२४ |

| | | |
|---|---|---|
| ४. | दोषारोप ठेवल्याची तारीख | १४/०३/२०२३ |
| ५. | संपरिक्षा चालु झाल्याची तारीख | ०४/१२/२०२४ |
| ६. | निकाला साठी राखीव ठेवल्याची तारीख | नाही. |
| ७. | निकाल तारीख | १८/०३/२०२६ |
| ८. | शिक्षा दिली असल्यास त्याची तारीख | नाही. |

## आरोपींची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | आरोपी अटक तारीख | आरोपीस जामीन दिल्याची तारीख | गुन्हा | आरोपीस शिक्षा दिली/निर्दोष मुक्तता | शिक्षा | आरोपी बंदी असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | पांडुरंग पुंडलिक कदम | -- | दि.०९/१०/२०२१ रोजी फौ.प्र.स.कलम ४१(अ)(१) प्रमाणे नोटीस | भा.दं.वि.क.३२४ ३२३,२९४,५०६ सह कलम ३४. | निर्दोष | निर्दोष | नाही |

## <u>भाग-क</u>

## फिर्यादी/बचाव पक्ष/न्यायालय/साक्षीदारांची यादी.

## (अ) फिर्यादी साक्षीदारांची यादी.

**अ.क्र.** **नाव** **पुराव्याचे स्वरुप**

(प्रत्यक्षदर्शी, पोलीस, तंज्ञ, वैद्यकीय, पंच व ईतर साक्षीदार)

सा.क्र.१ सुरेश बालाजी कदम, फिर्यादी

सा.क्र.२ यशवंत लक्ष्मणराव कदम, साक्षीदार

## (ब) बचाव पक्ष साक्षीदारांची यादी.

अ.क्र नाव पुराव्याचे स्वरुप

(प्रत्यक्षदर्शी, पोलीस, तंज्ञ, वैद्यकीय, पंच व ईतर साक्षीदार)

निरंक

## (क) न्यायालय साक्षीदारांची यादी.

अ.क्र. नाव पुराव्याचे स्वरुप

(प्रत्यक्षदर्शी, पोलीस, तंज्ञ, वैद्यकीय, पंच व ईतर साक्षीदार)

निरंक

## अभियोगपक्षाचे/बचाव /न्यायालयीन निशाणी

## (अ) अभियोगपक्ष

| निशाणी क्रमांक | साक्षीदार क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | निरंक | |

## बचाव पक्ष मान्य केलेल्या दस्तऐवजांची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | निरंक | |

## (ब) बचाव पक्ष नि.क्र.यादी.

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | निरंक | |

## (क) न्यायालय नि.क्र.यादी.

| अ.क्र. | वर्णन | नि.क्र. |
|---|---|---|
| १ | दोषारोप | (नि.क्र.१२) |
| २ | आरोपीचे निवेदण | (नि.क्र.१३) |

## (ड) मुद्देमाल वस्तु.

| अ. क्र. | मुद्देमाल वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | एम.आर.क्रमांक ६३/२०२१ | एक विठेचा तुकडा लालसर रंगाचा अर्धवट अंदाजे १ किलो २०० ग्रॅम वजनाचा. |

## :: <u>न्यायनिर्णय</u> ::

( घोषित दिनांकः– १८ मार्च, २०२६)

आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम ३२४, ३२३, २९४, ५०६ सहकलम ३४ अन्वये दोषारोप आहे.

**<u>अभियोग पक्षाचे संक्षिप्तरित्या कथन असे आहे की,</u>**

**०२.** दिनांक ०७/१०/२०२१ रोजी ०९.०० वाजता अगर त्या सुमारास मौजे येलापुर, ता.धर्माबाद येथे विधीसंघर्ष ग्रस्त बालक नामे साहेब उर्फ साहेबराव पांडुरंग व आरोपी पांडुरंग यांनी संगनमत करून पैसे देणे घेण्याचे कारणावरुन त्याचे घरासमोरील सार्वजनिक रोडवर फिर्यादी यास विधीसंघर्ष ग्रस्त बालक याने फिर्यादी यास तुझ्या मायला बहिणीला झवतो, मादरचोदा अशी अश्लील शिवीगाळ करुन पाठीमागुन हातात विटेचा तुकड्याने फिर्यादीचे मानेवर मारून दुखापत केली. आरोपी पांडुरंग याने फिर्यादी व चुलता हनुमान कदम यास लाथाबुक्याने मारहान करून जिवे मारण्याची धमकी दिली. म्हणुन तक्रारदार याने घटनेची तक्रार धर्माबाद पोलीस स्टेशन येथे दिली.

**०३.** तक्रारदार याने दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे अंमलदार पोलीस स्टेशन धर्माबाद यांनी आरोपींविरुध्द गुन्हा रजि. क्रमांक २३६/२०२१ भारतीय दंड विधान कलम ३२४, ३२३, २९४, ५०६ सहकलम ३४ अन्वये नोंद केली व गुन्हयाचे तपासकाम एस.ऐ. आडे, पो.हे.कॉ. यांच्याकडे सोपविण्यात आले. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे तपास टिपण नोंदविले, घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला, वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले व आरोपींविरुद्ध प्राथमिक स्वरुपाचा पुरावा आल्याने त्यांच्या विरुध्द उपरोक्त कलमांतर्गत दोषारोपपत्र दाखल केले.

**०४.** आरोपी हे न्यायालयात हजर झाले. आरोपींविरूध्द निशाणी क्र.१२ नुसार भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ३२३, २९४, ५०६ सहकलम ३४ अन्वये दोषारोप निश्चित केले व ते त्यांच्या बोलीभाषेत त्यांना वाचून व समजावून सांगितले. आरोपींनी त्यांचे निवेदन निशाणी क्र.१३ वर नोंदवले आणि गुन्हा केल्याचे स्पष्ट शब्दात नाकारले व संपरीक्षेची मागणी केली.

**०५.** आरोपींविरुद्ध कोणताही सबळ पुरावा मिळुन न आल्याने आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ३१३ प्रमाणे जबाब नोंदविण्यात आले नाहीत.

०६.        अभिलेखावरील साक्षीपुराव्याच्या अवलोकनावरून खालील मुद्दे माझे समोर उपस्थित होतात. मी सदर मुद्दयावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दिनांक ०७/१०/२०२१ रोजी ०९.०० वाजता अगर त्या सुमारास मौजे येलापुर, ता.धर्माबाद येथे आरोपींनी संगनमत करून फिर्यादीस विटेचा तुकडयाने फिर्यादीचे मानेवर मारून दुखापत केली, असे अभियोग पक्षाने सिद्ध केले काय? | **..नकारार्थी..** |
| २. | वरील नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत फिर्यादी व साक्षीदारास लाथाबुक्यांनी माराहण करून जखमी केले, असे अभियोग पक्षाने सिद्ध केले काय ? | **..नकारार्थी..** |
| ३. | वरील नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत फिर्यादी तुझ्या मायला बहिणीला झवतो, मादरचोदा अशी अश्लील शिवीगाळ केली, असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | **..नकारार्थी..** |
| ४. | वरील नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादी व साक्षीदारांना जीवे मारण्याची धमकी दिली आहे असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय? | **..नकारार्थी..** |
| ५. | आदेश काय? | **अंतीम आदेशाप्रमाणे** |

## <u>कारणमिमांसा</u>

०७.        अभियोग पक्षातर्फे सहा.सरकारी अभियोक्ता **श्रीमती. सी.बी. काळे** यांचा युक्तीवाद ऐकला तसेच आरोपींचे विधीज्ञ **श्री. एस.यु. जगदंबे** यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेख पडताळला.

**<u>मुद्दा क्रमांक १ ते ४ करिता:–</u>**

०८.        सदरचे मुद्दे हे समान पुराव्यावर अवलंबून असल्याने पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदर सर्व मुद्दयाबाबत एकत्रीतरीत्या विवेचन करण्यात येत आहे. अभियोग

पक्षाचा असा आरोप आहे की, आरोपींनी संगनमत करून पैसे देणे घेण्याचे कारणावरुन त्याचे घरासमोरील सार्वजनिक रोडवर फिर्यादी यास तुझ्या मायला बहिणीला झवतो, मादरचोदा अशी अश्लील शिवीगाळ करुन पाठीमागुन हातात विटेचा तुकड्याने फिर्यादीचे मानेवर मारून दुखापत केली. फिर्यादी व चुलता हनुमान कदम यास लाथाबुक्याने मारहान करून जिवे मारण्याची धमकी दिली.

**०९.** सा.क्र.१ सुरेश बालाजी कदम याच्या साक्षीत असे आले आहे की, तो आरोपीला ओळखतो. तो त्याच्या गावातील आहे. त्याला ब-याच गोष्टी आठवत नाही. दि.०७/१०/२०२१ रोजी काय झाले होते हे त्याला आठवत नाही. त्याने पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती किंवा नाही हे त्याला आठवत नाही. साक्षीदाराला त्याची मुळ फिर्याद दाखवण्यात आली. त्यातील मजकुर त्याला माहित नाही. त्यावर त्याची सही आहे.

**१०.** सा.क्र.२ यशवंत लक्ष्मणराव कदम, यांच्या साक्षीत असे आले आहे की, तो फिर्यादी व आरोपी यांना ओळखतो. ते त्यांच्या गावातील आहेत. दि.०७/१०/२०१९ रोजी आरोपी आणि फिर्यादी दरम्यान काय घटना घडली, हे त्याला माहित नाही. या व्यतिरीक्त काय घटना घडली याबाबत त्याला काही सांगायचे नाही.

**११.** वरील सर्व साक्षीदार हे अभियोग पक्षास पूरक अशी साक्ष देत नसल्याने, सरकारी वकिलांनी त्यांना सूचक स्वरुपाचे प्रश्न विचारण्याची विनंती केली. सदरची विनंती मान्य करण्यात आली. मात्र साक्षीदारांना सूचक स्वरुपाचे प्रश्न विचारुनही अभियोग पक्षास मदत होईल अशी कोणतीही बाब साक्षीदारांनी कथन केली नाही.

**१२.** अभियोग पक्षाचा अभिलेखावरील एकंदरीत पुरावा लक्षात घेता आरोपीने गुन्हा केला आहे असा निष्कर्ष काढणे अत्यंत चुकीचे होईल. कारण आरोपीविरुध्द अभियोग पक्षातर्फे कसलाही भक्कम, ठोस अथवा भरीव पुरावा अभिलेखावर आलेला नाही, अभियोग पक्षाच्या सर्वच साक्षीदारांनी अभियोगपक्षाच्या कथनाच्या पुष्टी मिळेल असे काहीच सांगितलेले नाही. त्यांचा साक्षीपुरावा अभियोगपक्षाला उपयोगी पडलेला नाही. त्यांच्या साक्षीपुराव्यातुन फिर्यादीमधील मजकुर शाबीत झालेला नाही. अभियोग पक्ष हा आरोपींविरुध्द

गुन्हा सिद्ध करण्यास अपयशी ठरला असल्याने मी **मुद्दा क्र.०१ ते ०४ चे उत्तर नकारार्थी** नोंदवीत आहे.

**<u>मुद्दा क्र.०५ करीताः</u>**

**१३.** सदर प्रकरणात आरोपीविरूध्द गुन्हा शाबीत करण्यास अभियोग पक्ष अयशस्वी झाला आहे. त्यामुळे आरोपीची निर्दोष मुक्तता करणे योग्य व न्यायाचे होईल तसेच प्रकरणातील जप्त मुद्देमाल एक विठेचा लालसर रंगाचा अर्धवट अंदाजे १ किलो २०० ग्रॅम वजनाचा मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नाश करणे योग्य होईल. म्हणून मी मुद्दा क्र.05 च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**:: <u>आदेश</u> ::**

०१. आरोपीची फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधान कलम ३२४, ३२३, २९४, ५०६ सहकलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र असणाऱ्या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

०२. आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येतात.

०३. जप्त मुद्देमाल एक एक विठेचा लालसर रंगाचा अर्धवट अंदाजे १ किलो २०० ग्रॅम वजनाचा मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नाश करण्यात यावे.

०४. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ अन्वयेची पूर्तता करावी.

०५. फौजदारी प्रक्रिया संहिते मधील तरतुदीनुसार प्रस्तुत न्यायनिर्णयाची माहिती तक्रारदार यास जिल्हा दंडाधिकारी, नांदेड यांचेमार्फत पाठविण्यात यावी.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)**

SANJAY MARUTI KOLEKAR

Digitally signed by SANJAY MARUTI KOLEKAR
Date: 2026.03.24 17:15:38 +0530

**(एस. एम. कोळेकर)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
धर्माबाद, जि. नांदेड.

दिनांक: १८/०३/२०२६

**<u>C E R T I F I C A T E</u>**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | |
|---|---|
| Name of the steno | A.K. Mohammad |
| Name of Court | Civil Judge Junior Division, Dharmabad |
| Date of Dictation | 18/03/2026 |
| Judgment signed by the P.O. on | 18/03/2026 |
| Judgment uploaded on | 24/03/2026 |